**<u>प्रतिवादी क्र.३ तर्फे उलटतपास श्री. जी. जे. पाटील वकील.</u>**

**१३.** माझ्याकडे दस्तलेखनाचा परवाना नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नि. क्र.५३ चा दस्त विनापरवाना सरकारच्या मान्यतेशिवाय लिहिलेला आहे. मी वादी व एकनाथ घोरपडे यांना सदर दस्त लिहिण्यापूर्वी ओळखत नव्हतो. मी वादी व एकनाथ घोरपडे यांच्या ओळखपत्राच्या प्रती दस्ताला जोडलेल्या नाहीत.

**१४.** दस्तावरील साक्षीदार उत्तूर व आर्दाळ येथील रहिवासी नाहीत. माझ्या समक्ष वादी व एकनाथ घोरपडे यांच्यामध्ये आर्थिक व्यवहार झाला नाही. नि. क्र.५३ च्या दस्तातील मिळकतीचे मूल्यांकन शासकीय मूल्यांकनाप्रमाणे करण्यात आलेले आहे. मला वादी व एकनाथ घोरपडे यांच्यामध्ये मिळकतीचा बाजारभावा प्रमाणे काय व्यवहार झाला याची माहिती नाही. मी विक्रीपत्रातील मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला होता. एकनाथ घोरपडे यांचे स्वतंत्र क्षेत्र असल्यामुळे सदर उता-यावरील इतर हिस्सेदारांची संमती घेतलेली नव्हती.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - ०४.०२.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.